पिंपरी चिंचवड महानगरपालिका
कॉर्पोरेशन इंटिग्रेटेड हेल्थ ऍ़ण्ड फॅमिली वेलफेअर सोसायटी
पिंपरी – ४११ ०१८
वैद्यकिय विभाग, मुख्य कार्यालय

---

# निवेदन

पिंपरी चिंचवड महानगरपालिका कॉर्पोरेशन इंटिग्रेटेड हेल्थ ऍ़ण्ड फॅमिली वेलफेअर सोसायटी पिंपरी – ४११ ०१८ अंतर्गत राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियानासाठी हंगामी/कंत्राटी पध्दतीने दरमहा एकत्रित मानधनावर वैद्यकीय अधिकारी, ए.एन.एम., स्टाफ नर्स, लॅब टेक्निशिअन, फार्मासिस्टया संवर्गातील पदे भरणे कामी उमेदवारांच्या थेट मुलाखती दि. 03/10/2017 ते 05/10/2017 या कालावधीत घेणेत आलेल्या होत्या. वरील पदांचे थेट मुलाखती मधून निवड झालेल्या उमेदवारांची निवड व प्रतिक्षा यादी पिं.चिं.म.न.पा. वेबसाईट दि.09/04/2018 रोजी प्रसिध्द करणेत आली होती.

सदर निवड यादी मधील उमेदवारांनी नियुक्ती आदेश स्विकारणेसाठी दि.24/04/2018 रोजी सकाळी 10:30 ते सांय 05:00 वाजेपर्यंत चाणक्य सभागृह, १ ला मजला, यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय (YCM Hospital), संत तुकारामनगर, पिंपरी १८ येथे उपस्थित रहावे. नियुक्ती आदेश स्विकारणेसाठी प्राधान्याने उमेदवार यांनी स्वतः उपस्थित रहावे.

दि.24/04/2018 रोजी रुजु होणेकामी उपस्थित न राहू शकणा-या उमेदवारांनी पोस्टाने प्राप्त नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासुन ते ७ दिवसापर्यंत वैद्यकीय विभाग, २रा मजला, मुख्य कार्यालय, पिंपरी चिंचवड महानगरपालिका भवन, आंबेडकर चौक, जुना मुंबई-पुणे हायवे, पिंपरी १८ येथे रुजू व्हावे. सदर मुदतीत रुजु न झालेस तदनंतर निवड समितीने तयार केलेल्या प्रतिक्षा यादीतील उमेदवारांना नेमणूक देणेत येईल याची नोंद घ्यावी.

क्र- वैद्य/ 1 का वि/ ८६०/ १८
दिनांक- 29/04/2018

वैद्यकिय संचालक
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११ ०१८